(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 05 मिनिटांनी 1.20 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

(नंतर श्री.जुन्नरे...

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सदनाचे माजी सदस्य व विद्यमान खासदार श्री. वसंत चव्हाण यांच्या आकस्मिक निधनामुळे सदनाचे कामकाज तहकूब करण्याबाबत.**

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आपल्याला एक विनंती करु इच्छितो की, या सभागृहाचे माजी सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव चव्हाण यांचे काल मध्यरात्री हृदय विकाराच्या धक्क्याने झोपेतच निधन झालेले आहे. कै. वसंतराव चव्हाण हे या सभागृहाचे एकंदर 18 वर्ष सदस्य होते. केवळ ते सदस्यच होते असे नव्हे तर या सभागृहाच्या कामकाजामध्ये त्यांनी वेळोवेळी अतिशय मोलाचे योगदान दिले होते. खरे म्हणजे ही दु:खद बातमी कळल्यापासून माझ्या सारख्या त्यांच्या अनेक आमदार, मंत्री, सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी, असंख्य मित्रांनी एक उमदा मित्र गमावलेला आहे. त्यांचे अंत्यदर्शन घेण्याची आपली सर्वांची इच्छा आहे. अशा प्रकारची परिस्थिती उद्‌भवली तर आपण सभागृहाचे कामकाज थांबवत नाही, तशी परंपराही नाही किंवा प्रथाही नाही आणि नियम सुध्दा नाही. शेवटी नियम हे आपणच तयार करीत असतो. आज कोणत्याही सन्माननीय सदस्यांची काम करण्याची मानसिकता नाही, इच्छा नाही. त्यामुळे मी सत्ताधारी पक्षाला विनंती करतो की, आजच्या घटनेचा अपवाद म्हणून, या घटनेचा प्रेसिडंट पुढे घेतला जाणार नाही, एक विशिष्ट परिस्थिती म्हणून आजचे सदनाचे कामकाज स्थगित करण्यात यावे. कै. वसंतराव चव्हाण यांनी या सभागृहाचे वैभव वाढवलेले आहे. कै. वसंतराव चव्हाण जेव्हा या सभागृहात सदस्य म्हणून आले होते तेव्हा मी सुध्दा या सभागृहात सदस्य म्हणून आलो होतो. त्यावेळी प्रा. बी.टी. देशमुख, कै. जयंतराव टिळक, श्री. रा.सू.गवई असे काही सदस्य होते. कै. वसंतराव चव्हाणांचे व्यक्तिमत्व, त्यांचे सर्वांशी असलेले मैत्रीचे संबंध आणि त्यांनी वेळोवेळी सगळयांशी ठेवलेले चांगले संबंध हे आम्ही कधीही विसरु शकणार नाहीत. त्यामुळे कै. वसंतराव चव्हाण यांच्या दु:खद निधनामुळे माझी मानसिक अवस्था चांगली राहिलेली नाही. त्यांच्या निधनाने माझ्यासारख्या अनेक सदस्यांचे हृदय दु:खी झालेले आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

म्हणून माझी सत्ताधारी पक्षाला विनंती आहे की, आजचे सभागृहापुढील कामकाज घेऊ नये तसेच आजचा निर्णय अपवादात्मक समजण्यात यावा. तसेच सर्व सन्माननीय सदस्यांची मानसिकता लक्षात घेऊन संसदीय कामकाज मंत्र्यांना तसेच आपल्याला विनंती करतो की, आजची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन, अपवादात्मक परिस्थिती म्हणून आजचे सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात यावे. सन्माननीय सदस्यांना कै. वसंतराव चव्हाण यांच्या अंत्यदर्शनासाठी जावयाचे असल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात यावे. तसेच आजच्या कामकाज पत्रिकेत पुरवणी मागण्यावर चर्चा ठेवलेली आहे, त्यामुळे उद्या 10.00 ते 12.00 या कालावधी एक्स्ट्रा सिटींग घेऊन कामकाज पूर्ण करावे व आजचे सभागृहापुढील कामकाज संपूर्ण दिवसभरासाठी स्थगित करावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

------------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो विषय मांडलेला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. आज सकाळी 9.00 वाजता कै. वसंतराव चव्हाण यांच्या निधनाची आम्हा सदस्यांना बातमी मिळाली. ही बातमी ऐकून आम्हाला धक्काच बसला. गेल्या चार वर्षापासून मी या सदनाचा सदस्य आहे. मी जेव्हा या सदनात सदस्य म्हणून आलो त्यावेळेस ते सुध्दा या सदनाचे सदस्य होते. कै. वसंतराव चव्हाण हे संसदीय कामकाजाचे गाढे अभ्यासक होते. ज्यावेळी सभागृहात घटनात्मक प्रसंग उभे राहात असे त्यावेळेस दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना योग्य मार्गदर्शन आणि घटनेची माहिती देऊन मार्ग काढण्याचा ते सतत प्रयत्न करीत असत. समाजातील रंजलेल्या, गांजलेल्या, दलित, शोषित, आदिवासी, पिडीत वर्गाचे प्रश्न ज्या ज्या वेळी सभागृहात उपस्थित होत त्यावेळेला पक्षभेद बाजूला सारुन त्यांच्या मागे उभे राहण्याची त्यांची नेहमीच भूमिका असायची.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

कै.वसंतराव चव्हाण हे या सभागृहाचे 18 वर्षे सदस्य होते. इतका मोठा प्रदीर्घ अनुभव असलेल्या सदस्याचे आकस्मिक दु:खद निधन झालेले आहे. नियतीचा खेळ किती क्रूर असतो. सभापती महोदय, अधिवेशन सुरु असताना विद्यमान सदस्याचे निधन झाले तर आपण त्या दिवशी सभागृहाचे कामकाज बंद ठेवतो. परंतु प्रथा व परंपरा बाजुला ठेवून आजच्या दिवसाचे कामकाज स्थगित करावे अशी माझी विनंती आहे. त्यांच्यासारख्या मोठ्या नेत्याला महाराष्ट्र मुकला आहे. त्यांच्या प्रती असलेल्या सभागृहाच्या भावना व्यक्त करण्यासाठी आज सभागृहाचे कामकाज थांबविणे आवश्यक आहे. सभापती महोदय, दुपारनंतर त्यांचा मृतदेह पुणे येथे नेण्यात येणार आहे अशी आमची माहिती आहे. तेव्हा सर्व सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना त्यांचे अंत्यदर्शन घ्यावयाचे आहे. तेव्हा ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी उपस्थित केलेल्या मुद्याचे मी समर्थन करतो आणि सभागृहाचे कामकाज बाजुला सारुन सभागृहाची बैठक स्थगित करावी अशी मी आपणास विनंती करतो.

----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, आज सकाळी श्री.वसंतराव चव्हाण यांच्या दु:खद निधनाची बातमी कळली. माझ्यासाठी ही बातमी अतिशय क्लेशदायक आणि दु:खदायक होती. ही बातमी ऐकून मला धक्काच बसला. या विधिमंडळात एका चांगल्या सन्माननीय सदस्याबरोबर काम करण्याची मला संधी मिळाली होती. महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी विधिमंडळातील सदस्यांनीच त्यांना राज्यसभेवर निवडून दिले होते. आज ते राज्यसभेचे विद्यमान सदस्य आहेत. असे असताना त्यांचा जीवन प्रवास असा तडकाफडकी संपेल यावर माझा अजूनही विश्वास बसत नाही. तसे त्यांचे वय देखील झालेले नव्हते. त्यांच्या पाठिशी खूप मोठा अनुभव होता. त्यांना राज्यसभेमध्ये अजून खूप काम करावयाचे होते, परंतु नियतीला ते मान्य नव्हते, म्हणूनच काल रात्रौ त्यांचे झोपेतच प्राणोत्क्रमण झाले. त्यावेळी त्यांच्याजवळ कोणीही नव्हते. मला ज्यावेळी ही बातमी कळली त्यावेळी माझा विश्वासच बसत नव्हता, म्हणून मी सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.गणेश नाईक आणि अन्य सदस्यांकडे विचारणा केली. अधिवेशन सुरु असताना विद्यमान सदस्यांचे निधन झाले तर आपण त्यादिवशी सभागृहाचे कामकाज बंद ठेवतो. ते महाराष्ट्रातून राज्यसभेवर प्रतिनिधीत्व करीत होते, त्याचा दुरान्वयाने आपल्याशी संबंध आहे. याचा विचार करुन सभागृहाचे आजच्या दिवसाचे कामकाज स्थगित करावे अशी माझी विनंती आहे. त्यांच्यासंबंधीचा शोकप्रस्ताव नंतर सभागृहात येईलच, परंतु आज सर्वच सन्माननीय सदस्यांना त्यांचे अंत्यदर्शन घ्यावयाचे आहे, तसेच सर्वच सन्माननीय सदस्य काम करण्याच्या मन:स्थितीत नाहीत. अशावेळी सभागृहाचे कामकाज सुरु ठेवणे उचित नाही. याठिकाणी सदस्य म्हणून असलेल्या सर्व सदस्यांशी त्यांचा चांगला परिचय होता. सत्ताधारी पक्षातील सदस्य असो वा विरोधी पक्षातील सदस्य असो सर्वच सदस्यांना त्यांचे अंत्यदर्शन घेण्याची इच्छा आहे. तेव्हा एक खास बाब म्हणून ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो विषय मांडला आणि त्यास माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी दुजोरा दिला. मी ही या प्रस्तावास माझ्या पक्षातर्फे दुजोरा देतो व या बाबतीत आपण निर्णय घ्यावा अशी मी आपणास विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

---------------

यानंतर श्री.पुरी....

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सभागृहाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी याठिकाणी जो विषय मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

कै.वसंतराव चव्हाण हे या सभागृहाचे सदस्य होते असेच केवळ नव्हे तर ते अतिशय ॲलर्ट व अतिशय जागरुकपणे काम करणारे सन्माननीय सदस्य होते. त्यांना राज्यसभेवर जाऊन फार कमी काळ झालेला आहे We feel that he is present in this House. आम्ही मॅजेस्टीक आमदार निवासात एकत्र राहत होतो. ज्यावेळी ते तालिका सभापतीस्थानी बसले होते, त्यावेळची मला आठवण येते. त्यावेळी मी पाटबंधारे विधेयकाच्या बाबतीत 5 सुधारणा दिल्या होत्या. त्यावेळी 18-18 असे मतदान झाले होते, त्यावेळी त्यांनी असे जाहीर केले होते की, मी माझे कास्टींग व्होट मागासवर्गीयांना देत आहे. त्यावेळी सगळया सुधारणा कॅरी झाल्या. पुन्हा ते विधेयक खालच्या सभागृहात गेले. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांनी निवेदन केले. शिर्डीच्या विधेयकाबाबतही त्यांनी अतिशय ठामपणे भूमिका घेतली होती. विचारपूर्वक भूमिका घेणारी अशी ही जीवंत प्रवृत्ती होती. त्यांच्याबद्दल आपल्या सर्वांच्या मनात आदराची भावना आहे. आम्ही सकाळी त्याठिकाणी जाऊन आलो, त्यावेळेला आम्हाला त्याठिकाणी थोडावेळ थांबावे असे वाटले होते, परंतु सभागृह असल्यामुळे थांबता आले नाही. आम्हाला तेवढी धावपळ करता आली नाही. त्याठिकाणी माननीय उप मुख्यमंत्रीही येऊन गेल्याचे आम्हाला कळले. त्यामुळे मला असे वाटते की, एक अपवाद म्हणून ही गोष्ट आपण करावी. नियम हे नियमांच्या जागी असतात, विद्यमान सदस्य असेल तरच आपल्याला असे करता येते, परंतु एक अपवाद म्हणून व त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी आपण सभागृहापुढील विषय मान्य करावा, असे मी याठिकाणी प्रतिपादन करतो.

------

..2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, श्री.वसंतराव चव्हाण यांच्या धक्कादायक निधनाचे वृत ऐकून आमच्यासारखे कार्यकर्ते अत्यंत हादरुन गेले आहेत. या सभागृहामध्ये त्यांनी 18 वर्षापर्यंत या सभागृहाची शान, वैभव वाढविण्याचे काम केले. अशा प्रकारचे हे उमदे व्यक्तिमत्व होते, सर्वांवर प्रेम करणारे आणि सर्वांशी मैत्रीचे नाते जोडणारे असे हे व्यक्तिमत्व होते. या सभागृहामध्ये त्यांच्यासोबत राहून त्यांची 4 वर्षांची कामगिरी पाहून आम्हाला त्यांच्याकडून बरेच काही शिकायला मिळाले व त्यामुळे आम्ही प्रभावित झालो. ते तालिका सभापतीस्थानी असताना त्यांनी केलेल्या कार्याची आणि अनेक चर्चेमध्ये भाग घेत असताना त्यांच्या कामगिरीची व विद्वत्तेची चुणूक आम्हाला आढळून आली. विशेषत: शिर्डी संस्थानाच्या संदर्भातील जे विधेयक आले होते तेव्हा त्यांनी अत्यंत विद्वत्ताप्रचूर अशाप्रकारचे भाषण केल्याचे आम्हास अनुभवायला मिळाले. त्यावेळी त्यांचे भाषण अत्यंत अविस्मरणीय अशाप्रकारचे झाले होते. शोषित, वंचित, पीडित समाजाच्या हक्कांसाठी लढणारा असा एक बाणेदार लढवय्या असे त्यांचे होते. त्यांच्या अचानक व धक्कादायक निधनामुळे संपूर्ण सभागृहातील सन्माननीय सदस्यांची मन:स्थिती ही अत्यंत शोकाकुल झालेली आहे. त्यामुळे याठिकाणी सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, विरोधी पक्षनेते, श्री. पांडुरंग फुंडकर, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, प्रा. बी.टी.देशमुख यांनी...

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे..........

सदनाच्या वतीने या ठिकाणी विनंती केली आहे. सदनाचे नियम, प्रथेप्रमाणे विद्यमान सन्माननीय सदस्यांचे निधन झाले तरच सभागृहाचे काम स्थगित केले जाते. आज अपवादात्मक प्रसंग उद्‌भवलेला आहे. 18 वर्षे त्यांनी या सभागृहामध्ये संविधानिकरित्या अत्यंत मोलाचे आणि मौलिक योगदान दिले आहे त्यांच्या संदर्भामध्ये जो ठराव सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी मांडला आहे त्याला मी पाठिंबा देतो व सन्माननीय संसदीय कार्यमंत्री आणि आपणाला नम्र विनंती करतो की, आजच्या दिवसाचे कामकाज स्थगित करावे. कै.वसंतराव चव्हाण यांचे कलेवर पोस्टमार्टेमसाठी रुग्णालयात नेण्यात आले आहे, ते दोन वाजेपर्यन्त पक्ष कार्यालयामध्ये अत्यंदर्शनासाठी ठेवले जाणार आहे, त्यांचे अंत्यदर्शन सर्वांना घेता यावे म्हणून सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करावे. जे कामकाज शिल्लक राहिल ते वाटल्यास उद्या अतिरिक्त बैठक घेऊन पूर्ण करु. त्यामुळे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी मांडलेल्या ठरावास मी पाठिंबा देतो व दिवसभरासाठी कामकाज स्थगित करावे, अशी विनंती करतो.

-----------------

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MHM/ KGS/

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य, सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यानुसारच सर्व सदनाची देखील भावना आहे. आपणा सर्वांना माहित आहे की, अतिशय दुर्देवी घटना घडली आणि श्री.वसंतराव चव्हाण यांचे दु:खद निधन झाल्याची बातमी समजल्यानंतर विधिमंडळामध्ये आणि या संपूर्ण आवारामध्ये एक शोककळा पसरली. कै.वसंतराव चव्हाण आणि या सभागृहाचा संबंध 18 वर्षांपेक्षा अधिक काळाचा आहे. सभागृहाचे सदस्य म्हणून, मंत्री म्हणून आणि आता राज्यसभेचे सदस्य म्हणून त्यांनी केलेले कार्य आपण सर्वांनी जवळून पाहिले आहे. ज्या मॅजेस्टिक आमदार निवासात ही घटना घडली त्या ठिकाणापासून विधान भवन हे फारसे लांब नाही. वास्तविक पाहता आपला असा नियम आहे की, विद्यमान सन्माननीय सदस्यांना मृत्यू आला तर आपण सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करतो. परंतु, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी आणि इतरही सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात धेऊन एक अपवाद म्हणून सभागृहाचे आजच्या दिवसाचे कामकाज स्थगित करावे. परंतु, आजच्या कामकाज पत्रिकेवरील विशेष करुन पुरवणी मागण्या आणि विधेयक हे कामकाज उद्या विशेष बैठक घेऊन पूर्ण करण्याबाबतचाही विचार आपण करावा, अशी माझी विनंती आहे.

-----------------------

..3...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MHM/ KGS/

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी जो प्रस्ताव सभागृहात मांडला आहे त्याबाबत त्यांची व माझी मॅजेस्टिक आमदार निवासामध्ये चर्चा झाली होती. परंतु, कै.वसंतराव चव्हाण यांची डेड बॉडी पोस्ट मार्टेमसाठी पाठवावयाची असल्यामुळे मला या ठिकाणी येण्यास विलंब झाला. पण सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी केलेल्या सूचनेशी मी सहमत आहे. हा दु:खद प्रसंग आज येईल अशी बातमी कळेपर्यन्त मला शंका सुध्दा आली नव्हती. काल सायंकाळी 5.00 वाजेपर्यन्त राष्ट्रवादी पक्ष कार्यालयामध्ये आमची बैठक सुरु होती, सायंकाळी 07.00 वाजेपर्यन्त श्री.वसंतराव चव्हाण आणि मी एकत्र होतो.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ........ 13:45

श्री.आर.आर.पाटील ..........

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या निवडणूका सुरु आहेत आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ते निर्वाचन अधिकारी होते. रात्री 9.30 वाजता त्यांचा मला फोन आला. त्यांनी मला असे विचारले की, आबा आज तुम्ही फार गंभीर वाटत होता. तुम्ही टेन्शन घेऊ नका असे सांगून टेन्शन कमी करण्यासाठी त्यांनी मला 5 मिनिटे विविध जोक्स सांगितले. आज पुन्हा 3.00 वाजता आमची बैठक होणार होती आणि आजच ही धक्कादायक बातमी समजली. ते माझे जवळचे मित्र होते. एखाद्या विषयावर प्रतिक्रिया व्यक्त करावयाची असेल, मत मांडावयाचे असेल, निर्णय घ्यावयाचा असेल तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मार्गदर्शन करणारे ते अधिकार केंद्र होते. त्यांच्या जीवनाचा इतिहास बघितला तर ज्या समाजाला शिक्षणाची फार मोठी परंपरा नव्हती अशा समाजामध्ये जन्म होऊन सुध्दा एल.एल.बी. च्या परीक्षेमध्ये त्यांनी गोल्ड मेडल मिळविले होते. आपण आपल्या व्यक्तिगत कुटुंबासाठी जगावे ही भूमिका सोडून देऊन त्यांनी जीवनाची वाटचाल केली. सुरुवातीच्या काळात पक्षातर्फे त्यांना महानगरपालिकेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. त्या काळातील सर्वच वरिष्ठ नेत्यांनी हा दलित समाजातील युवक राजकारणामध्ये चमकू शकतो म्हणून त्यांना सन 1980 मध्ये विधानसभेची उमेदवारी देण्यात आली. सन 1980 ते 1985 या काळामध्ये त्यांनी विधानसभेचे प्रतिनिधित्व केले आणि 18 वर्षे या सभागृहाचे प्रतिनिधित्व केले. महानगरपालिका सदस्य म्हणून, विधानसभा सदस्य म्हणून, नगर विकास मंत्री म्हणून, विधान परिषद सदस्य म्हणून आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते म्हणून त्यांनी काम केलेले आहे. त्यांना जेथे काम करावयाची संधी मिळाली तेथे त्यांनी आपल्या कामाचा वैशिष्ट्यपूर्ण असा ठसा उमटविला आहे. त्यांना इंग्रजी भाषा चांगल्या प्रकारे येत होती, हिंदी भाषेवर त्यांचे प्रभूत्व होते आणि मराठी भाषेचा तर त्यांना व्यासंग होता. एकदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयामध्ये मी आणि कै.वसंत चव्हाण बसलेलो होतो. त्यावेळी ते बराच वेळ उर्दू वर्तमानपत्र बघत होते. मी त्यांना विचारले, त्यावेळी त्यांनी उर्दू वाचण्यास सुरुवात केली. त्यांना उर्दू येत होते. त्यांनी मला असे सांगितले की, मी गुजराती आणि पंजाबी भाषाही शिकणार आहे. पुढच्या वर्षापर्यंत मी साऊथची भाषा बोलू शकलो पाहिजे, असेही त्यांनी मला एकदा सांगितले होते. सतत अभ्यास करीत राहिले पाहिजे, असे त्यांचे विचार होते. अशा प्रकारचे एक व्यासंगी व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेलेले आहे. आपण महाराष्ट्रातून खासदारांना निवडून

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ........ 13:45

श्री.आर.आर.पाटील ..........

देतो, त्यांना अनेक वेळा भाषेची अडचण येते. मात्र राज्यसभेमध्ये प्रवेश केल्यानंतर हा खासदार कोठून निवडून आलेला आहे असे सर्वांनी विचारावे, असा ठसा त्यांनी पहिल्याच दिवशी राज्यसभेत उमटवून दाखविला. एका चांगल्या राजकारण्याला आमचा पक्ष मुकलेला आहे. त्यांचे अन्य पक्षांशी आणि नेत्यांशी देखील चांगले संबंध होते. राजकारणामध्ये आपली भूमिका कोठपर्यंत रेटावी याचे त्यांना भान असे आणि ती रेटत असतांना त्यांनी आपला मुद्दा कधीच सोडला नाही. ज्यावेळी मागासवर्गीयांचे, दलितांचे, गोरगरिबांचे, झोपडपट्टीवासियांचे प्रश्न असावयाचे त्यावेळी पक्षाचा जाहीरनामा तयार करतांना उच्चभ्रूंना प्राधान्य न देता गोरगरिबांना प्राधान्य दिले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. पक्षाचा जाहीरनामा तयार करावयाचा असू द्या किंवा पक्षाचे धोरण ठरवावयाचे असू द्या त्यावेळी श्री.वसंत चव्हाण आमचे मार्गदर्शक असावयाचे. एका खूप चांगल्या नेत्याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दुरावला आहे.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ....

परंतु एक खूप सहृदयी नेत्याला अवघा महाराष्ट्र आज मुकला आहे. सभापती महोदय, शेवटी या सदनाचे काही नियम आहेत, परंपरा आहेत, प्रथा आहेत आणि त्या पाळावयाच्या असतात. परंतु नियमांसाठी सदन नसते तर सदनासाठी नियम असतात. आज दुपारी 2.30 वाजता स्व. वसंत चव्हाण यांची बॉडी पक्ष कार्यालयासमोर आणली जाणार आहे. तेव्हा काही अपवाद हे आपण नेहमीच करीत असतो म्हणूनच या ठिकाणी सदनाच्या दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या सदनाचा नेता म्हणून मी आपणास विनंती करतो की, स्व. वसंतराव चव्हाणांच्या कुटुंबियांच्या दु:खामध्ये सहभागी होण्यासाठी एक विशेष बाब म्हणून आजचे सदनाचे दिवसाचे कामकाज स्थगित करावे. आपण माझी, संपूर्ण सदनाची विनंती मान्य कराल अशी अपेक्षाही आम्ही व्यक्त करतो.

**सभापती** : सदनातील ज्येष्ठ सदस्य सन्माननीय श्री.गडकरी, त्याचबरोबर सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, बी.टी.देशमुख, जोगेंद्र कवाडे, माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील आणि सभागृहाचे नेते व उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या भावनांशी मी स्वत: देखील सहमत आहे. सदनाच्या प्रथा, परंपरा आहेत त्या एका अपवादात्मक परिस्थितीमध्ये काहींशा बाजूला ठेवून निर्णय घेण्यासारखाच हा प्रसंग आहे. स्व. वसंतराव चव्हाण हे 1980 पासून सलग गेली 26 वर्षे माझे व्यक्तिगत मित्र होते. खालच्या सदनामध्ये ते 5 वर्षे सदस्य होते आणि या सदनामध्ये देखील ते 18 वर्षे सदस्य म्हणून काम करीत होते. संसदीय लोकशाहीमध्ये लोक प्रतिनिधी किती प्रभावी असू शकतो आणि गोरगरीब जनतेचे प्रश्न अत्यंत प्रभावीपणे मांडू शकतो याचे आगळेवेगळे रूप म्हणजेच वसंतराव चव्हाण होते. दुर्दैवाने काल मध्यरात्री नंतर त्यांचे निधन झ ाालेले आहे. ते मॅजेस्टिक आमदार निवास, मुंबई येथे मुक्कामाला होते. या सदनाच्या दोन्ही बाजूंच्या सदस्यांनी या व्यक्तिमत्त्वाबद्दल आत्यंतिक आपुलकी आणि आदर दाखविला आहे ते व्यक्तिमत्त्व राज्यसभेचे खासदार म्हणून असताना आता आपल्यातून काळाच्या पडद्याआड गेले आहेत त्याने जो काही बसलेला धक्का आहे त्यामुळे सदनाच्या प्रथा-परंपरा काहीशा बाजूला ठेवून, एक अपवाद म्हणून आजचे सभागृहाचे कामकाज मी येथेच तहकूब करीत आहे. त्यानंतर आजचे जे

..... जी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

कामकाज आहे ते उद्या घेण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करावयाचा आहे.

सभागृहाचे आजचे कामकाज उद्या घेण्याच्या दृष्टीने सभागृहाची विशेष बैठक उद्या बुधवार, दिनांक 12 जुलै, 2006 रोजी सकाळी 10.30 ते 1.00 वाजेपर्यंत घेण्यात येऊन, या विशेष बैठकीमध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा घेण्यात येईल आणि त्या नंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या सकाळी 10.30 वाजता पुन्हा भरेल.

सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 54 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 12 जुलै 2006 च्या सकाळी 10 वाजून 30 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही